# महाराष्ट्र शासन
# कृषि विभाग

## जाहिरात

## एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, राष्ट्रीय कृषी विकास योजना, राष्ट्रीय आयुष अभियानांतर्गत औषधी वनस्पती घटक योजना व भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना
## सन २०१९-२०

राज्यात सन २०१९-२० मध्ये एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, राष्ट्रीय आयुष अभियानांतर्गत औषधी वनस्पती घटक योजना, राष्ट्रीय कृषि विकास योजना व भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना राबविण्यात येणार असून, खालील नमूद केलेल्या घटक व उपघटकांकरीता लाभ घेण्यासाठी इच्छुक शेतक-यांकडून अर्ज मागविण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे.

| अ. क्र. | घटक | ग्राहय प्रकल्प खर्च | अर्थसहाय्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| **अ. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत राष्ट्रीय फलोत्पादन अभियान / राष्ट्रीय कृषि विकास योजना** | | | |
| १ | **गुणवत्तापुर्ण लागवड साहित्य**<br>लहान रोपवाटीका तयार करणे. | रू. १५.०० लाख प्रती हेक्टर | प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त रु. ७.५० लाख (बँक कर्जाशी निगडीत) (खाजगी क्षेत्र) |
| २ | **क्षेत्र विस्तार** | | |
| | १. हळद लागवड व रोपवाटिका | सरासरी लागवड खर्च रु. ०.३० लाख प्रति हे. (जास्तीत जास्त १ हे. प्रति लाभार्थी) | लागवड साहित्य खर्चाच्या ४० टक्के किंवा रक्कम रू.०.१२ लाख/हे. |
| | २. स्ट्रॅाबेरी लागवड (ठिबकसह) | सरासरी लागवड खर्च रु. २.८० लाख प्रति हे. (जास्तीत जास्त १ हे. प्रति लाभार्थी) | लागवड साहित्य खर्चाच्या ४० टक्के किंवा रक्कम रू. १.१२ लाख /हे. |
| ३ | **जुन्या फळबागांचे पुनरूज्जीवन**<br>१. संत्रा, २. मोसंबी, ३. आंबा<br>(प्रति लाभार्थी २ हे. मर्यादेत) | रु. ०.४० लाख प्रति हे. | ५० टक्के किंवा जास्तीत जास्त रू.०.२० लाख प्रती हेक्टर |
| ४ | **अळिंबी उत्पादन प्रकल्प**<br>१. अळिंबी उत्पादन प्रकल्प | रु. २०.०० लाख प्रति युनिट | खर्चाच्या ४० टक्के किंवा रू.८.०० लाख /युनिट (बँक कर्जाशी निगडीत) |
| | २. अळिंबी बीज उत्पादन प्रकल्प | रु. १५.०० लाख प्रति युनिट | खर्चाच्या ४० टक्के किंवा रू. ६.०० लाख /युनिट (बँक कर्जाशी निगडीत) |
| | ३. कंम्पोस्ट मेकिंग युनिट | रु. २०.०० लाख प्रति युनिट | खर्चाच्या ४० टक्के किंवा रू.८.०० लाख /युनिट (बँक कर्जाशी निगडीत) |
| ५ | **सामुहिक शेततळे**<br>अ.२४ मी.X२४ मी. X ४.७ मी.<br>ब. ३० मी. X३० मी.X४.७ मी.<br>क.३४ मी.X ३४मी.X४.७ मी. | मापदंडानुसार | मापदंडानुसार |
| ६ | वैयक्तिक शेततळे अस्तरीकरण | मापदंडानुसार | मापदंडानुसार |
| ७ | **फलोत्पादन यांत्रिकीकरण**<br>१. टॅक्टर-२०.पी.टी.ओ. एच.पी. पर्यंत | रु. ३.०० लाख प्रती युनिट | रु. १.०० लाख प्रती युनिट (अनु.जाती व जमाती, महिला, लहान व सिमांत शेतकरी)<br>रु.०.७५ लाख प्रती युनिट (सर्वसाधारण प्रवर्ग) |

| अ. क्र. | घटक | ग्राह्य प्रकल्प खर्च | अर्थसहाय्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| | २. पॉवर टिलर ८ बीएचपी. पेक्षा कमी | रु.१.०० लाख प्रती युनिट | रु.०.५० लाख प्रती युनिट (अनु.जाती व जमाती, महिला, लहान व सिमांत शेतकरी)<br>रू.०.४० लाख प्रती युनिट (सर्वसाधारण प्रवर्ग) |
| | ३.पॉवर टिलर ८ बीएचपी. व पेक्षा जास्त | रु.१.५० लाख प्रती युनिट | रु.०.७५ लाख प्रती युनिट (अनु.जाती व जमाती, महिला, लहान व सिमांत शेतकरी)<br>रू.०.६० लाख प्रती युनिट (सर्वसाधारण प्रवर्ग) |
| ८ | **संरक्षित शेती -**<br>१. हरीतगृह उभारणी<br>(प्रति लाभार्थी ०.४० हे. मर्यादेत) | सर्वसाधारण क्षेत्रासाठी रू.८४४ ते रु. १४६५ प्रती चौ .मी. (मॉडेलनुसार) व डोंगराळ क्षेत्रासाठी १५ टक्के जास्त | प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के |
| | २. शेडनेट गृह उभारणी<br>(प्रति लाभार्थी ०.४० हे. मर्यादेत) | सर्वसाधारण क्षेत्रासाठी रू.७१० ते रु.८१६ प्रती चौ.मी. (मॉडेलनुसार) व डोंगराळ क्षेत्रासाठी १५ टक्के जास्त | प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के |
| | ३. उच्च दर्जाचे लागवड साहीत्य<br>हरितगृह - फुले व भाजीपाला<br>शेडनेटगृह - फुले | रू. १४० ते ७०० प्रती चौ.मी. विविध फुलपिके व भाजीपाला पिकांनुसार | प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के |
| | ४. प्लास्टीक मल्चींग<br>(प्रति लाभार्थी २ हे.मर्यादेत) | रू. ३२,०००/- प्रती हे. सर्वसाधारण क्षेत्र<br>रु. ३६,८००/- प्रती हे. डोंगराळ क्षेत्र | रू. १६,०००/- प्रती हे. सर्वसाधारण क्षेत्र<br>रु. १८,४०० प्रती हे. डोंगराळ क्षेत्र |
| ९ | **कांदाचाळ** | रू. ७००० प्रती मे.टन | खर्चाच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त रू. ३५००/- प्रती मे.टन ( १५, २०, २५ मे.टन क्षमतेच्या कांदाचाळीसाठी) |
| १० | **मधुमक्षिका पालन**-<br>बी-ब्रीडरकडुन मधुमक्षिका वसाहतीचे उत्पादन करणे | प्रकल्प खर्च रू. १०.०० लाख | प्रकल्प खर्चाच्या ४० टक्के किंवा रु. ४.०० लाख (बँक कर्जाशी निगडीत) |
| | मधुमक्षिका वसाहत<br>संच वाटप | रू.२०००/- प्रति वसाहत किंवा संच | खर्चाच्या ४० टक्के<br>( रू. ८००/- प्रती वसाहत /संच) |
| | **काढणीपश्चात व्यवस्थापन** | | |
| ११ | प्राथमिक प्रक्रिया केंद्र<br>(फलोत्पादित पिके) | प्रकल्प खर्च रु.२५.०० लाख<br>(बँक कर्जाशी निगडीत) | ्रअ. सर्वसाधारण क्षेत्र- ४० टक्के<br>ब. डोंगरी व अधिसूचित क्षेत्र- ५५ टक्के |
| १२ | शितखोली (३० मे. टन क्षमता) | प्रकल्प खर्च रू. १५.०० लाख<br>(बँक कर्जाशी निगडीत) | अ. सर्वसाधारण क्षेत्र ३५ टक्के<br>ब. डोंगरी व अधिसूचित क्षेत्र ५० टक्के |
| १३ | पूर्वशितकरण गृह ( ६ मे. टन क्षमता) | प्रकल्प खर्च रू. २५.०० लाख<br>(बँक कर्जाशी निगडीत) | अ. सर्वसाधारण क्षेत्र ३५ टक्के<br>ब. डोंगरी व अधिसूचित क्षेत्र ५० टक्के |
| १४ | एकात्मिक पॅक हाऊस<br>(रु. ५०.०० लाख प्रकल्प खर्च) (९ मी X १८ मी. आकारमान) | प्रकल्प खर्च रू. ५०.०० लाख<br>(बँक कर्जाशी निगडीत) | अ. सर्वसाधारण क्षेत्र ३५ टक्के<br>ब. डोंगरी व अधिसूचित क्षेत्र ५० टक्के |
| १५ | शितगृह<br>(अधिकतम ५००० मे. टन क्षमता) | प्रकल्प खर्च प्रति मे.टन<br>रू. ८०००/- (Type-I)<br>रु. १००००/- (Type-II)<br>(बँक कर्जाशी निगडीत) | अ. सर्वसाधारण क्षेत्र ३५ टक्के<br>ब. डोंगरी व अधिसूचित क्षेत्र ५० टक्के |
| १६ | एकात्मिक शितसाखळी | प्रकल्प खर्च रू. ६००.०० लाख<br>(बँक कर्जाशी निगडीत) | अ. सर्वसाधारण क्षेत्र ३५ टक्के<br>ब. डोंगरी व अधिसूचित क्षेत्र ५० टक्के |
| १७ | रेफ्रिजेटर व्हॅन<br>(४ ते ९ मे. टन क्षमता) | प्रकल्प खर्च रू. २६.०० लाख<br>(बँक कर्जाशी निगडीत) | अ. सर्वसाधारण क्षेत्र ३५ टक्के<br>ब. डोंगरी व अधिसूचित क्षेत्र ५० टक्के |
| १८ | रायपनिंग चेंबर<br>(अधिकतम ३०० मे. टन क्षमता) | प्रकल्प खर्च रू. १.०० लाख प्रति मे. टन<br>(बँक कर्जाशी निगडीत) | अ. सर्वसाधारण क्षेत्र ३५ टक्के<br>ब. डोंगरी व अधिसूचित क्षेत्र ५० टक्के |
| १९ | फिरते विक्री केंद्र<br>(राज्य/राष्ट्रीय महामार्गा लगतच्या शेतकरी/ शेतकरी गट) | रू. ०.३० लाख प्रती युनिट. | खर्चाच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त रु. ०.१५ लाख |
| **ब. राष्ट्रीय आयुष अभियानांतर्गत औषधी वनस्पती घटक योजना** | | | |
| औषधी वनस्पती लागवड योजना व इतर घटक | | मापदंडानुसार | मापदंडानुसार |

| अ. क्र. | घटक | ग्राहय प्रकल्प खर्च | अर्थसहाय्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| (शतावरी, अश्वगंधा, गुगुळ, सफेद मुसळी.इ.) | | | |
| क. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना | | | |
| क्षेत्र विस्तार<br>(आंबा, सिताफळ, संत्रा, मोसंबी, इ.) | | योजनेच्या शासन निर्णयातील फळ पिकांच्या मापदंडानुसार | मापदंडानुसार |

## अटी व शर्ती :-

१. उपरोक्त घटकांकरीता शेतक-यांनी स्वतंत्ररित्या www.hortnet.gov.in या संकेतस्थळावर दैनिक वृत्तपत्रात जाहीरात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासुन एका महिन्याच्या कालावधीत ऑनलाइन अर्ज सादर करावेत. कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन पध्दतीने अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

२. सन २०१८-१९ मध्ये हॉर्टनेट प्रणालीवर अर्ज केलेल्या परंतु पुर्वसंमती न मिळालेल्या शेतक-यांचा सन २०१९-२० मधील यादीमध्ये समावेश करण्यात येणार असल्याने पुनश्चः ऑनलाईन अर्ज करण्याची आवश्यकता नाही. सन २०१८-१९ मधील पुर्वसंमती न मिळालेले अर्ज व सन २०१९-२० मधील ऑनलाईन अर्ज यांची एकत्रीत यादी करून सोडत पद्धतीने ज्येष्ठता सुची तयार करण्यात येईल.

३. सामुहिक शेततळे -

- सामुहिक शेततळे या घटकाचा लाभ नानाजी देशमुख कृषि संजिवनी प्रकल्पातंर्गत औरंगाबाद, जालना, बीड, लातुर,
  नांदेड, परभणी, हिंगोली, उस्मानाबाद, अकोला, अमरावती, वाशिम, यवतमाळ, बुलढाणा, वर्धा, जळगाव तसेच विदर्भातील नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया व भंडारा व कोकण विभागातील पालघर, ठाणे रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्हयातील सर्व प्रवर्गातील अर्जदार पात्र राहतील.
- सामूहिक शेततळे या घटकाकरीता राज्यातील सर्व जिल्हयातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती संवर्गातील अर्जदार पात्र राहतील. मात्र उपरोक्त २५ जिल्हे वगळता इतर जिल्हयांमधील सर्वसाधारण प्रवर्गातील अर्जदारांना सामुहिक शेततळे हा घटक अनुज्ञेय राहणार नाही.
- राज्यातील सर्व जिल्ह्यातील गट शेतीस प्रोत्साहन व सबलीकरण योजनेंतर्गत निवड झालेल्या व ज्या प्रकल्पात शेततळे हा घटक प्रस्तावित केलेला आहे अशा गटांना या घटकाचा लाभ अनुज्ञेय राहील.
- अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती संवर्गातील अर्जदाराने सामूहिक शेततळे मंजूर करताना त्यांच्याकडे फलोत्पादन पिके असणेबाबतची अट शिथिल राहील. परंतु शेततळयास पूर्वसंमती देताना संबधित अर्जदाराने भविष्यात फलोत्पादन पिके घेण्याविषयी हमीपत्र देणे बंधनकारक राहील.

४. शेतक-यांच्या शेतावर घ्यावयाच्या घटकांबाबत सादर केलेल्या ७/१२ वरील मालकी प्रमाणेच कार्यवाही होईल.संरक्षित शेती, कांदाचाळ इत्यादी घटकांसाठी लिज ॲग्रीमेंट (भाडेपट्टे करार) ग्राह्य धरला जाणार नाही.

५. केंद्र शासनाकडून सन २०१९-२० मध्ये मंजुरी प्राप्त होणा-या वार्षिक कृती आराखड्यातील घटक/उपघटकाचे लक्षांक प्रवर्गनिहाय व जिल्हानिहाय वाटप करण्यात येतील.

६. उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्या अनुदानाच्या मर्यादेत व अटीशर्तीमध्ये शासनाने सन २०१९-२० साठी बदल केल्यास त्याप्रमाणे अनुदान देय राहील.

७. सन २०१९-२० पासुन संरक्षित शेती घटकांतर्गत विविध मॉडेलच्या पॉलीहाउस, शेडनेटहाऊस करीता काटेकोर शेती विकास केंद्र व कृषि विद्यापिठाच्या समितीच्या शिफारसीप्रमाणे अनुदान देय राहील.

८. काढणीत्तोर व्यवस्थापन घटकांतर्गत शीतगृह, रायपनिंग चेंबर, पुर्व शितकरणगृह, शितसाखळी इ. बाबतचे प्रस्ताव केवळ फलोत्पादन पिक उत्पादन क्षेत्रातील कच्च्या मालाची उपलब्धता जेथे असेल अशा क्षेत्रातील प्रकल्पांसाठीच अर्ज करावेत. तसेच कृषी विभागामार्फत राबविण्यात येणा-या SMART व PoCRA या प्रकल्पांतर्गत स्थापन झालेल्या शेतकरी उत्पादक कंपनींना अनुदान अनुज्ञेय राहिल.

९. भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेअंतर्गत सिताफळ व लिंबू यांची रोपे/ कलमे शासन निर्णय व इतर अटीशर्तीच्या अधिन राहून अर्ज स्विकारण्यात येत आहेत.

१०. जाहिरातीत नमूद केलेल्या कुठल्याही घटकाच्या अंमलबजावणी दरम्यान शासनाने वेळोवेळी केलेले बदल/निर्णय अंतिम राहतील.

११. बँक कर्जाशी निगडीत असलेल्या घटकांकरीता पुर्वसंमती मिळाल्यापासुन तीन महिन्यांच्या कालावधीत बँकेकडुन कर्ज मंजूर करुन घेणे अनिवार्य राहील. अर्जदाराने तीन महिन्यांच्या कालावधीत कर्ज मंजुरी कागदपत्रे संबधित कार्यालयात सादर न केल्यास पुर्वसंमती आपोआपच रद्द होईल.

१२. एका कुटुंबातील (कुटुंब - पती, पत्नी व अठरा वर्षाच्या आतील मुले) सदस्यांनी वेगवेगळया घटकासाठी अर्ज केल्यास फक्त कुटुंबातील एक अर्ज एका घटकासाठी (एक योजना, एक कुटुंब, एक घटक) ग्राह धरण्यात येईल.

१३. उपरोक्त घटकांसाठी अर्जाचा विहीत नमुना www.hortnet.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून अधिक माहितीसाठी नजिकच्या तालुका कृषि अधिकारी, कार्यालय तसेच संबधित गावातील कृषि सहाय्यक यांच्याशी संपर्क साधावा.

स्वाक्षरीत/-

**व्यवस्थापकीय संचालक**
**महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि**
**औषधी वनस्पती मंडळ, पुणे**